■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 73 ■ मंगळवार,22 एप्रिल 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5



डॉ.तानाजी सावंतांचा शिवसेनेतून पत्ता कट?

>> सविस्तर वृत्त पान ३

दैनिक आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com



हिंदी विषय सक्तीचा; विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करा

>> सविस्तर वृत्त पान ४

# जलजीवनचा १० टक्के लोकवाटा भरण्यास धाराशिव जिल्ह्यातील ५०८ गावांचा नकार

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव : जलजीवन मिशन या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेला धाराशिव जिल्ह्यात अपेक्षित गती मिळत नसल्यामुळे योजनेची लक्षपूर्ती होण्यास असंख्य अडचणी येत आहेत. योजनेतील निकषानुसार योजनेच्या खर्चातील १० टक्के लोकवाटा गावांनी भरणे बंधनकारक असतानाही जिल्ह्यातील योजना सुरू असलेल्या सर्व ५०८ गावांनी हा लोकवाटा भरण्यास नकार दिला आहे. तसेच तीन वर्षे झाली तरी २४ गावात योजनेचे कामच सुरू झाले नाही. जिल्ह्यात ५९४ पैकी फक्त २८७ योजना पूर्ण झाल्या असून, प्रलंबित कामांना आणखी सहा महिने मुदतवाढ दिली आहे. दिलेल्या मुदतीत ३०७ योजना कशा पूर्ण होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

## ■ योजनेला गती मिळेना ५९४ पैकी फक्त २८७ योजना पूर्ण
## ■ योजनेतील २७ विहिरी कोरड्या, सदर विषय वादग्रस्त ठरणार

२०२१ – २२ पासून धाराशिव जिल्ह्यातील ५०८ गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत ५९४ कामे सुरू आहेत. या मिशनसाठी केंद्र व राज्य सरकार प्रत्येकी ४५ टक्के निधी देणार आहे. तर १० टक्के निधी त्या त्या गावांतून लोकवाटा गोळा करून हे मिशन यशस्वी करण्याचे दोन्ही सरकारांनी ठरविले. मात्र, ५०८ गावांपैकी एकाही गावाने अजून स्वतःचा १० टक्के हिस्सा जिल्हा परिषदेकडे भरलेला नाही. लोकवाटा भरला जात नसल्याने जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागासमोर एक नवा पेच निर्माण झाला आहे. ५०८ ग्रामपंचायतींकडे सुमारे २० कोटी लोकवाटा थकला आहे. सद्यःस्थितीत २८७ कामे शंभर टक्के पूर्ण झाली आहेत. ही गावे देखील १० टक्के लोकवाटा देण्यास तयार नाहीत. त्यामुळे योजनेच्या पूर्णत्वात अडथळे येत आहेत. शासनाच्या ९० टक्के उपलब्ध निधीतूनच जल जीवन मिशन योजनेची कामे सुरू आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना योजनेचे महत्त्व कळावे, त्याची गरज वाटावी म्हणून १० टक्के लोकवाटा गावांनी भरावा, असा उद्देश ठेवून योजना सुरू केली होती. हल्ली गुत्तेदारांची बिलं केंद्र आणि राज्य सरकारांच्या ९० टक्के निधीतूनच दिली जात आहेत. ग्रामपंचायतींकडील १० टक्के लोकवाट्यासंबंधी सरकार काय निर्णय घेते ? याकडे जिल्हा परिषदेचे लक्ष लागले आहे. जल जीवन मिशनमुळे बहुतांश गावांचा पाणी प्रश्न निकालात निघत असल्याने लोकवाटा भरण्याची तत्परता ग्रामपंचायतींनी दाखवावी, अशी अपेक्षा आहे. एकाही गावाने लोकवाटा भरण्यात पुढाकार न घेतल्याने हा प्रश्न भविष्यात वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे.





### ५९ गुत्तेदारांवर दंडात्मक कार्यवाही

या योजनेच्या कामाला गती न देणाऱ्या गुत्तेदारांवर पाणीपुरवठा विभागाने दंडात्मक कार्यवाही केली आहे. अशा ५९ गुत्तेदारांवर ही कार्यवाही केली आहे. यामध्ये गुत्तेदारांकडून निविदेच्या १ ते ६ टक्के पर्यंत रक्कम वसूल करण्यात येणार आहे. आणखी एकाही गुत्तेदाराकडून पैसे वसूल केले नसले तरी अंतिम बिल काढताना दंडाची रक्कम वजा करून बिल दिले जाणार आहे.

### २४ गावात योजनेचे काम करण्यास जागाच उपलब्ध नाही

जलजीवन मिशन योजना सुरू करून तीन वर्षे झाली तरी धाराशिव जिल्ह्यातील २४ गावात या योजनेचे काम अजूनही सुरूच झालेले नाही. या २४ गावात जलजीवनचे काम करण्यासाठी जागाच उपलब्ध नाही असे तेथील ग्रामपंचायतने विभागाला कळवले आहे. या सर्व ग्रामपंचायतना नोटीस बजावून जागा उपलब्ध करून देण्याचे आदेश काढले तरीही त्याला एकाही ग्रामपंचायतने जुमानले नाही.

### योजनेला आणखी सहा महिने मुदतवाढ

२०२१–२२ मध्ये सुरू करण्यात आलेली जलजीवन मिशन योजना पूर्ण करण्यासाठी ३१ मार्च २०२४ पर्यंतच मुदत होती. या मुदतीत जिल्ह्यातील फक्त ३० टक्केच कामे पूर्ण झाल्याने शासनाने एक वर्ष मुदतवाढ देऊन ३१ मार्च २०२५ पर्यंत कामे पूर्ण करण्यास सांगितले परंतु, वर्षभरात फक्त २० टक्केच कामे पूर्ण झाली. सध्या ५९४ पैकी २८७ कामे म्हणजे निम्मी कामे पूर्ण झाली आहेत. राहिलेल्या कामांसाठी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे.

### योजनेला गती देण्यासाठी दर आठ दिवसाला आढावा

जलजीवन मिशन योजनेला गती देण्यासाठी दर आठ दिवसाला आढावा बैठक घेऊन गुत्तेदारांना सूचना दिल्या जातात. सध्या ५९ गुत्तेदारांवर दंडात्मक कार्यवाही केली आहे. योजनेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे.

**–मोहन सरोदे**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग.**

## उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांनी काळजी घेण्याचे धाराशिव नगर परिषदेचे आवाहन



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरात उष्णतेची लाट वाढत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी,असे आवाहन धाराशिव नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी केले आहे. नागरिकांनी भरपूर पाणी प्यावे तसेच लिंबूपाणी, फळांचे रस, ताक यासारख्या थंड पेयांचे सेवन करावे. दुपारी १२ ते ३ या अत्यंत उष्णतेच्या वेळेत घराबाहेर जाणे शक्यतो टाळावे. गरज असल्यास डोक्यावर टोपी, छत्री, टॉवेल किंवा इतर पारंपरिक साधनांचा वापर करूनच बाहेर पडावे. मसालेदार अन्न, अल्कोहोल, चहा, कॉफी आणि गोड पदार्थांचे सेवन टाळावे. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि गर्भवती महिलांची विशेष काळजी घ्यावी.अनवाणी बाहेर न जाण्याचेही नागरिकांनी भान ठेवावे,असेही आवाहन केले आले आहे.

## गुन्हेगारीला आळा घालण्याच्या मागणीसाठी मोर्चा

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा शहरातील अवैध धंदे बंद करून गुंडाच्या डोळ्याचा बंदोबस्त करण्यात यावा, गोविंदराम दंडगुले यांच्यावरील हल्ल्याचा तपास उमरगा पोलिसांकडे न ठेवता इतर यंत्रणेमार्फत करण्याच्या मागणीसाठी मी वडार महाराष्ट्राचा या संघटनेमार्फत सोमवारी (दि.२१) पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढण्यात आला. दरम्यान या संदर्भाने व्यापारी महासंघाने मोर्चात सहभागी होऊन गुन्हेगारीला आळा घालण्याच्या मागणीचे निवेदन पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांना दिले. बाजारपेठेतील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून मूक मोर्चाला प्रारंभ झाला. संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक दिवसापासून उमरगा शहरामध्ये खुनी हल्ल्याचे अनेक प्रकार घडले आहेत. गोरगरीब समाजातील अनेक समाज बांधवावर अवैद्य सावकारी व अवैध धंदे यांच्या माध्यमातून उमरगा शहरामध्ये गुंडाच्या अनेक टोळ्या सक्रिय झालेल्या आहेत. गुंड्याच्या म्होरक्याकडून तरुण मुलांकडून तलवारी, कत्ती, कुऱ्हाडीचा वापर मारहाणीसाठी केला जातो.

१५ एप्रिलला भरदिवसा उमरगा शहरातील मुख्य रस्त्यावर कार मधून आलेल्या व्यक्तींनी वडार समाजाचे बांधकाम व्यावसायिक गोविंद दंडगुले यांच्यावर प्राण घातक हल्ला केला. दहशतीच्या अशा घटनेमुळे शहरातील नागरिकात असुरक्षितची भावना निर्माण झालेली आहे. प्राणघातक हल्ल्याचा तपास उमरगा पोलिसांकडून होईल याची खात्री नसल्याने, तपास स्वतंत्र एसआयटी किंवा सीआयडी मार्फत करण्यात यावा असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेचे गोविंद पवार, मारुती देवकर, तानाजी दंडगुले, बंडू पवार, दत्ता कुराडे, शरणाप्पा घोडके, विठ्ठल पवार, राम धोत्रे, रोहित पवार, व्यंकट पवार, नागेश पाथ्रूट यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या मोर्चात माजी आमदार ज्ञानराज चौगुले, आमदार प्रवीण स्वामी, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष कैलास शिंदे, युवा सेनेचे किरण गायकवाड, ॲड.अजिंक्य पाटील, वंचित बहुजन आघाडीचे राम गायकवाड, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस मधुकर यादव, शाहूराज माने, व्यापारी संघाचे सचिव शिवप्रसाद लड्डा या सर्व नेत्यांनी झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करत पोलीस यंत्रणांकडून गुन्हेगारी रोखण्याची मागणी केली. सर्वपक्षीय नेत्यांनी गुन्हेगारांना पाठीशी न घालता गुन्हेगारी वेळीच रोखण्यासाठी एकत्र येण्याविषयी एकमुखी भावना यावेळी व्यक्त केली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी सदाशिव शेलार, पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले.



### स्थानिक गुन्हे शाखेकडून तपास

गोविंद दंडगुले हल्ला प्रकरणी त्यांच्या नातेवाईकांना तक्रार देण्याची विनंती करून ही प्रतिसाद नव्हता, त्यामुळे वरिष्ठांशी चर्चा करून सरकार पक्षातर्फे फिर्याद दिली आहे. याप्रकरणी आणखी कुणावर संशय असल्यास तशी फिर्याद घेतली जाईल. यापुढे या प्रकरणाचा तपास धाराशिवच्या स्थानिक गुन्हे शाखेकडून केला जाईल असे सांगून उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार यांनी उमरगा भागातील सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करण्याच्या सूचना पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांना दिल्या.

## बांधकाम साहित्य पुरवतो म्हणून धाराशिव येथील व्यक्तीची २ कोटी २० लाखांची आर्थिक फसवणूक

आरंभ मराठी । धाराशिव

बांधकामासाठी साहित्य पुरवण्यासाठी कंपनीला २ कोटी २० लाख रुपये देऊनही कंपनीने धाराशिव येथील व्यक्तीला बांधकामाचे साहित्य न देऊन तब्बल २ कोटी २० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना घडली.

यासंबधी सविस्तर वृत्त असे की, यातील आरोपी जन्नु ओस्वाल (रा. टिंबर मार्केट पुणे), वेलकम ट्रेडर्सचे मालक विक्रम शंकरलाल जाजोट (रा. प्लॉट नं २१४ संत तुकाराम रोड हिंदुस्थान को ऑ बॅक समोर मुंबई), आशा पुरा स्टील ट्रेडर्स आळंदी पुणे याचे मालक मांगीलाल सुनाजी पुरोहित या तिघांनी दिनांक ५ मार्च २०२४ ते १९ मार्च २०२४ दरम्यान फिर्यादी दिलीप दादासाहेब साळुंके ( वय–५० हरिश्चंद्र नगर, जुना उपळा रोड, धाराशिव) यांच्याकडून बांधकामाचे साहित्य स्टील, सिमेंट पुरवतो म्हणून २ कोटी २० लाख रुपये आरटीजीएस च्या माध्यमातून घेतले होते. आरोपींनी उत्कर्ष स्मॉल फायनान्स बॅक शाखा उल्हासनगर येथील शाखेच्या अकाउंटवरील क्र १६४६०२००००००२२८ वर ही रक्कम स्वीकारली आहे. परंतु, पैसे घेऊनही त्यांनी फिर्यादीला बांधकामाचे साहित्य पुरवले नाही तसेच पैसेही परत केले नाहीत. आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करुन आर्थिक फसवणुक केली. दिलीप साळुंके यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.दं. वि.सं.कलम ४२०,४०६.३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## ऐन लग्नसराईत सोने नव्या उंचीवर; भाव लाखाच्या घरात

### आणखी भाव वाढण्याची शक्यता

आरंभ मराठी । धाराशिव

मागील काही दिवसांत सतत वाढणाऱ्या सोन्याच्या दराने सोमवारी (दि.२१) नवीन विक्रम केला. सोन्याच्या भावाने लाखाच्या घरात पाऊल टाकले. त्यामुळे सोने खरेदी करणाऱ्यांचा खिसा आता आणखी रिकामा होणार आहे. सोमवारी बाजार उघडताच सोन्याच्या एक तोळ्याचा म्हणजेच १० ग्रॅम सोन्याचा भाव ९९ हजार ५०० रुपयांवर जाऊन पोहोचला. त्यामुळे आता सोने खरेदी ही सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यापलीकडे गेल्याचे दिसत आहे. सध्या चीन आणि अमेरिकेतील व्यापार युद्ध सुरू आहे. यातून जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरतेचा परिणाम सोन्याच्या किंमतींना जाणवू लागला आहे. अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. ज्यामुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीच्या शोधात सोन्याकडे वळत आहेत. अधिक परतावा हवा असेल तर सोनं खरेदी करा असा सल्लाही गुंतवणूक तज्ज्ञांनी यापूर्वीच दिला आहे. त्यामुळे मागणी वाढल्याने सोन्याच्या दरात मोठी उसळी पाहायला मिळत आहे. दरम्यान, येत्या ३० एप्रिलला अक्षय तृतीया हा सण असून, हा साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक शुभमुहूर्त समजला जातो. यादिवशी सोन्याचा भाव एक लाखांचा टप्पा ओलांडेल, असा अंदाज होता. मात्र, त्यापूर्वीच सोन्याच्या भावाने लाखाचा टप्पा पार केला आहे. सोमवारी २४ कॅरेट सोन्याचा एक तोळ्याचा भाव जीएसटी सह ९९ हजार ५०० वर गेला होता. तर २२ कॅरेट चा एक तोळ्याचा भाव ८७ हजार रुपयांवर गेला होता. चांदीचा भाव एका किलोसाठी ९९ हजार रुपये इतका आहे. सध्या लग्नसराई सुरू असल्यामुळे सोन्याला मोठी मागणी आहे. त्यातच गुंतवणूकदार देखील सोन्यामध्ये गुंतवणूक करू लागले आहेत. त्यामुळे सोन्या–चांदीच्या भावात दररोज वाढ होत आहे. पुढच्या काही दिवसात सोने सव्वा लाखांवर जाईल असाही अंदाज व्यक्त केला जात आहे.



### भाव वाढले तरीही ग्राहकांचा प्रतिसाद

सोमवारी सोन्याच्या भावाने विक्रम केला तरीही ग्राहकांची संख्या कमी झालेली नाही. मागील एक महिन्यांपासून सोन्याच्या किंमती सतत वाढत आहेत. परंतु, लग्नसराई आणि पाडव्या सारख्या सणांमुळे ग्राहकांनी सोने खरेदी करणे सुरूच ठेवले आहे. अक्षय तृतीयेचा सणदेखील आठ दिवसांवर आलेला आहे. त्यामुळे मागणी वाढतच जाणार आहे. दररोजच सोन्याचे भाव नवीन विक्रम प्रस्थापित करत आहेत.


**–व्यंकटेश ओमासे**
**कालिका ज्वेलर्स, धाराशिव.**

## धाराशिवला आणणार कामगार, सहकार न्यायालये

### जिल्हा विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. अमोल वरुडकर यांची माहिती

आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यात लेबर न्यायालय सहकार न्यायालय व कामगार न्यायालय नाही. त्यामुळे या जिल्ह्यातील सहकारसंबंधी व कामगार विषयक खटले चालविल्यास अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे नाईलाजास्तव तक्रारदारांना देखील सदरील न्यायालये ही सोलापूर व लातूर येथे असल्यामुळे तेथे जावे लागते. त्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंडा बरोबरच त्यांच्या वेळचा देखील मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. ही निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी माझ्या कालावधीमध्ये शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून लेबर, सहकार व कामगार न्यायालये धाराशिव येथे आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती धाराशिव जिल्हा विधीज्ञ मंडळाचे नूतन अध्यक्ष ॲड. अमोल वरुडकर यांनी दिली.



ॲड. वरुडकर यांनी म्हटले आहे की, शासकीय नोकरी मिळणे कठीण असल्यामुळे वकिलीचा कोर्स पूर्ण करून २००४ पासून वकिली व्यवसायात पाऊल टाकले. सुरुवातीला ज्येष्ठ विधीज्ञ. मिलिंद पाटील यांच्या हाताखाली कामकाज २००८ पर्यंत काम केले. यादरम्यान मी स्वतः देखील काही फौजदारी खटले न्यायालयांमध्ये त्याची सक्षमपणे बाजू मांडून न्याय पदरी पाडून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. मात्र २००८ मध्ये वाशी तालुक्यातील इंदापूर येथील यादव यांच्या खून प्रकरणी १६ जणांवर आरोप ठेवण्यात आले होते. हे आव्हान माझ्यासमोर मोठे होते. हे प्रकरण सातारा येथील ॲड धैर्यशील पाटील, पुणे येथीलॲड.हर्षद निंबाळकर, ॲड.दत्तात्रेय (आबा) बारखडे व मी स्वतः याप्रकरणी सक्षमपणे बाजू मांडण्याचे काम केले. तो खटला जिल्हा सत्र न्यायालयात ३ वर्षे चालला, त्याचा निकाल २०११ साली लागला. या प्रकरणाने माझ्या वकिली व्यवसायाला जबरदस्त टर्निंग पॉईंट (कलाटणी) मिळाल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर माझा न्यायालयामध्ये बाजू मांडण्याचा प्रचंड आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचे त्यांनी नमूद केले.

## बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. दोन वर्षापूर्वी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. जम्मू काश्मीर सारख्या निसर्गाच्या नंदनवनात काल निसर्गाने काल जो प्रकोप दाखवला तो पाहून सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. जम्मू काश्मीरमध्ये ढगफुटी झाली. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमध्ये हाहाकार उडाला. क्षणात संपूर्ण प्रदेश जलमय झाला. प्रचंड पाऊस आणि भूस्खलन झाल्याने तीन जनांना आपला जीव गमवावा लागला. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमधील जनजीवन विस्कळित झाले. शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागले. तिथे अजूनही बचावकार्य चालू आहे. ऐन उन्हाळ्यात निसर्गाने दाखवलेल्या या उग्र रूपाने सर्वजण आवाक झाले. जम्मू काश्मीरमध्ये अशा प्रकारचा पाऊस यापूर्वी पाहिला नव्हता असे तेथील जुने जाणते लोक सांगत आहेत. केवळ जम्मू काश्मीरच नाही तर देशातील अनेक राज्यात अशाप्रकारचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

# हिरवळीने नटलेली पृथ्वी विनाशाच्या उंबरठ्यावर!




सध्या सूर्य प्रचंड आग ओकतोय. अंगाची ल्हाई ल्हाई होत आहे, हे चालू वर्ष सर्वात जास्त उष्णतेचे वर्ष म्हणून नोंद होण्याची दाट शक्यता आहे. केवळ माणूस नावाच्या प्राण्यामुळे पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढतच चालले आहे.पृथ्वीवर जिथे जिथे माणसांचा संचार वाढला आहे तिथे तिथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. झाडांची बेसुमार कत्तल झाली आहे आणि सिमेंटचे जंगल वाढले आहे. म्हणून एकेकाळी विविधतेने व हिरवळीने नटलेली सुंदर पृथ्वी म्हणजे आपली वसुंधरा आज विनाशाच्या उंबरठ्यावर आहे.ती आता कुरुप होत चालली आहे. २२ एप्रिल हा दिवस जगभर जागतिक वसुंधरा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आपण सर्वांनी आपली पृथ्वी ओसाड, रखरखीत व कुरूप होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.

एकेकाळी झाडे, लतावेली व हिरवळीने नटलेली पृथ्वी किती सुंदर आणि मनमोहक दिसायची. जिकडे तिकडे झाडांची गर्दीच गर्दी होती.जंगलाचे प्रमाण संतुलित होते.जंगलात पशुपक्षांची गर्दीच गर्दी होती.सजीवसृष्टी नेहमी हिरवीगार आणि फुलाफळांनी बहरलेली होती.पक्षांचा मंजूळ किलबिलाट,वाऱ्याची झुळूक आणि मुसळधार पाऊस यांनी पृथ्वीचे रूप नेहमी सुंदरतेने ओतप्रोत भरलेले दिसायचे.नद्या नेहमी स्वच्छ व नितळ पाण्याने भरलेल्या असायच्या. अगदी लहान गावे,खेडी,वाडी,तांडे झाडांच्या गर्दीत लपलेले दिसायचे. जिकडे तिकडे कसे मनमोहक व आल्हाददायक असे पृथ्वीचे रूप पाहून मनाची तृप्ती होत असे. परंतु,माणूस नावाच्या प्राण्यांची नियत बदलली.त्याने कारखाने, बंगले उभे करण्यासाठी,रस्ते व रेल्वे मार्गाचे जाळे पसरवण्यासाठी झाडांची बेसुमार कत्तल सुरू केली.आणि इथूनच पृथ्वीच्या विनाशाचा मार्ग सुरू झाला.पृथ्वी ओसाड,उजाड आणि वृक्षहीन होऊ लागली. तरीही आपण सगळे गप्प कसे?वृक्षाविना ओसाड,उजाड व कुरूप पृथ्वी कल्पनाच करवत नाही.

आपल्या देशाची राजधानी दिल्लीमध्ये प्रदुषणाचा बोलबाला वाढला आहे.इथली हवा अतिशय दुषीत आहे.इथे शुद्ध ऑक्सिजन मिळणे कठीण झाले आहे.मुंबई महाराष्ट्राची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी आहे.लोकल रेल्वेने प्रवास करताना पाहिले असता रेल्वे रुळावर व कडेला कचरा व घाण साचलेले दिसतात. मुंबई लगतचा अरबी समुद्र फार प्रदुषित झाला आहे. त्याच्या पाण्यावर जिकडे तिकडे कचरा पसरलेला दिसतो.महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच शहरांमध्ये जागोजागी कचऱ्याचे ढीग साचलेले दिसतात.बहुतांश शहरात अगदी दर्शनीय ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. खूप मोठ्या संख्येने असलेले कारखाने हवा प्रदूषित करत आहेत. तसेच जलप्रदूषण वाढवत आहेत. शहरांच्या बाहेर कचऱ्याचे ढीग उघड्यावर टाकलेले दिसतात, कचरा जाळून प्रदुषण वाढवले जाते.बऱ्याच गावांमध्ये घरी शौचालय असुनही त्याचा वापर न करता सरळ उघड्यावर जाऊन गाव परिसरात घाणीचे साम्राज्य पसरवले जाते.ही सगळी कृपा मानवाच्या निष्काळजी पणाची आणि चलता है या वाईट वृत्तीची आहे.हिरव्यागार झाडीत लपलेली गावे आता ओसाड,उजाड झाली आहेत आणि सिमेंटच्या जंगलात होरपळून निघत आहेत. झाडांची संख्या कमी झाल्याने जमिनीची धूप वाढली आहे.पाऊस बेभरवशाचा झाला आहे.एक तर कोरडा दुष्काळ पडतो,नाही तर ढगफुटी होऊन शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते,जीवीतहानी सुध्दा होते.म्हणजे गरजेपोटी नव्हे तर चंगळवादी जीवनासाठी माणसाने पृथ्वीला विनाशाच्या खाईत लोटले आहे.हे कितपत योग्य आहे?

या पृथ्वीवर माणसांचा संचार जेथे जेथे होत आहे तेथे तेथे घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसत आहे. केवळ माणूस नावाच्या प्राण्यामुळे पृथ्वी प्रदुषणाच्या विळख्यात अडकली आहे.माती,पाणी आणि हवा मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाले आहेत.यावर उपाययोजना फक्त सरकारी यंत्रणेने करावी आम्ही नागरिक मात्र प्रदुषण करत राहू अशी मानसिकता तयार झाली आहे.जे झाले ते पुरे झाले.स्वतःच्या पायावर धोंडा मारुन घेण्यापेक्षा प्रत्येकाने सावध होण्याची गरज आहे.पर्यावरणप्रेमी बनून आपल्या सुंदर व हरित पृथ्वीला नष्ट होण्यापासून वाचवण्याची खरी गरज आहे. जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सर्वांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!चला सजग होऊया,पर्यावरण रक्षक बनून पुन्हा एकदा आपल्या लाडक्या पृथ्वीला सृष्टी सौंदर्याने नटवूया!

**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

## पृथ्वी सुरक्षित तर जीवसृष्टी सुरक्षित



पृथ्वीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे आणि यामुळे ऑक्सिजनची मात्रा सुध्दा कमी होत आहे. ही घटना करोना महामारीच्या रूपाने आपण उघड्या डोळ्यांनी पाहिली. यामुळे जगात लाखोंच्या संख्येने जिवीतहानी सुध्दा झाली. याकरीता पृथ्वीला वाचवण्यासाठी सर्वांनी ''संकल्प''करण्याची गरज आहे. आज बदलत्या हवामानामुळे दिनांक २० एप्रिल २०२५ ला देशात नागपूरची सर्वात हॉट शहरांमध्ये नोंद करण्यात आली.कारण नागपूरचा पारा ४४.७ अंश डिग्री सेल्सियस ने संपूर्ण विदर्भ होरपळून निघाला.जगात पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने १९७० पासून ''जागतिक पृथ्वी दीवस''साजरा करण्यात येतो. प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदुषणापासुन मुक्त झाले. भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदुषण दुर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परिस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसुन येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छीन्न-विछीन्न झाल्याचे दीसुन येते व यामुळे हवामान अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे. त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दीसुन येतात.यामुळे संपूर्ण जगात स्थलप्रदुषण,वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहिला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप,ज्वालामुखीचा उद्रेक,सुनामी, महाप्रलय, महामारी,साथीचे रोग,अती पाउस,अती उष्णता,अती थंडी,वनवे लागने अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दिसत आहेत. ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दिसून येतात. आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे. यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसते.सध्याच्या परीस्थितीत चिन जैविक हतीयार बनविणारा देश बनलेला आहे. चीन असा देश बनला आहे की तो नेहमीच जैविक हत्याराचे वेगवेगळे परीक्षण करीत असतो.२०१९ मध्ये चिनने ''कोरोणा व्हायरसचे'' परीक्षण करून मानवजातीसोबत ''खुनी तांडव'' केल्याचे दिसून आले. आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले,तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दिसतात. यामुळे दीवसेंदीवस पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे ग्लोबल वॉर्मिंगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे.पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ,बिबट्या,अस्वल,हरीण,बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दिसतात. १९७० मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी ''२२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस'' साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दीवस म्हणुन साजरा केला जातो. आज जगात २०० हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे.त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने २२ एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी करोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पाहिला आहे. मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहेत. आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा ''संकल्प'' जगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे.आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवू शकते. आज संपूर्ण जगाने एकत्र येऊन पृथ्वीला वाचविण्याचा ''संकल्प'' केला पाहिजे. दिवसेंदिवस समुद्राच्या पाण्याची पातळी वाढुन पृथ्वीवरील जमिनीचा भुभाग कमी-कमी होतांना दिसतो. याकरीता ग्रामीण भागातून शहराकडे येणारा लोंढा थांबवीला पाहीजे व सरकारने शेतीला सर्वतोपरी प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. पृथ्वी दिनाच्या निमित्ताने सर्वांना आग्रह व विनंती करतो की नैसर्गिक ऑक्सिजन वाढविण्यासाठी जंगल तोड थांबवायला हवी व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्यायला हवा. यामुळे ''गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन'' मिळण्यास मोठी मदत मिळेल व पृथ्वी वाचेल. पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मुलमंत्र जगातील संपूर्ण देशांनी जपायला हवा.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## तुळजापूर येथील नवोदय विद्यालयात ॲथलेटिक स्पर्धेचा शुभारंभ



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर येथील पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात अमरावती संकुल स्तरीय स्पर्धेचा प्रारंभ सोमवारी (दि.२१) करण्यात आला. या स्पर्धेचे उद्घाटन पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय सोलापूरचे प्राचार्य संजय कोठाडी यांच्या द्वारे हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सचिन खोब्रागडे, वरिष्ठ अध्यापक चक्रपाणि गोमारे, क्रीडा अध्यापक रवींद्र अलसेट, सुनेत्रा अलसेट, हरी जाधव उपस्थित होते. या स्पर्धा २१ व २२ एप्रिल अशी दोन दिवस चालणार असून, अमरावती संकुल मधील अकोला, बीड ,भंडारा, बुलढाणा ,चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, नागपूर, वाशिम, यवतमाळ ,लातूर ,नांदेड, परभणी सोलापूर ,धाराशिव या जिल्ह्यांचा समावेश असून यामध्ये ३११ खेळाडूंनी भाग घेतला आहे. या स्पर्धा वयोगट १४, १७, १९ या वयोगटातील मुला मुलींमध्ये होणार आहेत. या अथलेटिक स्पर्धेमध्ये १००,२००,४००,६००, ८००,१५००,३०००,५००० मीटर धावणे, गोळा फेक, थाळीफेक, भालाफेक, उंच उडी, लांब उडी, अडथळा शर्यत, तिहेरी उडी, क्रॉस कंट्री, हॅमर थ्रो अशा वेगवेगळ्या स्पर्धा वेगवेगळ्या गटात घेण्यात येणार आहेत. यातून निवड झालेल्या स्पर्धकांना विभागीय खेळासाठी पुढे पाठवण्यात येणार आहे. या स्पर्धा पाहण्यासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक वृंद उपस्थित होता. या क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा अध्यापक आर एम अलसेट व श्रीमती एस आर अलसेट विशेष परिश्रम घेत आहेत.

# आदर्श: आदर्श चरित्रे




शिक्षक हा चोखंदळ वृत्तीचा असावा. नाविन्याचा शोध घेण्याची वृत्ती त्याच्याकडे असावी लागते. ती वृत्ती सौ. सुदर्शना गणपत मोरे यांच्या कडे दिसते. आदर्श चरित्रे या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच पार पडले. चाळीस पानी या छोट्या पुस्तकात दहा थोरांची चरित्रे समाविष्ट आहेत.सौ. सुदर्शना मोरे लिखित हे पुस्तक शाळेतील लाडक्या विद्यार्थ्यांना समर्पित केले आहे. त्यांच्या अर्पण पत्रिकेतील उल्लेखावरून त्यांच्याकडे विद्यार्थ्याप्रती असणारे प्रेम दिसून येते. खरं तर मोठयांची चरित्रे छोट्या रुपात लिहणे हे एक कौशल्य असते. आणि ते अत्यंत साध्या सोप्या आणि सरळ भाषेत सौ. मोरे यानी हे कौशल्य वापरले आहे. घराला ग्रंथालय करणारे घरातील सदस्य असल्यानंतर आणि रोज विद्यार्थी सहवासात वावरत असताना मनाची वृत्ती कृतीत उतरवण्याची उर्मी जागृत होते आणि त्या कृतीला प्रोत्साहन मिळाले तर नक्कीच नवनिर्माण होते. उच्च पदस्थ असणारे विभागीय शिक्षण उपसंचालक लातूर डॉ.गणपराव मोरे यांच्या प्रोत्सहनातून हे नवनिर्माण सुदर्शना मोरे यांच्याकडून झाले आहे. श्री.गणपतराव मोरे प्राथमिक शिक्षक ते उपसंचालक या प्रवासातील अनुभवी व्यक्ती आहेत. नजर आकाशी पण पाय जमिनीवर आणि शिक्षकमित्र भावनेने संवादशील माणूस असणारे गणपतराव मोरे.. त्यांच्या अर्धांगिनी सौ. सुदर्शना मोरे. धाराशिव परिसरातील भाई उद्धवराव पाटील , शेजारच्या सोलापूर जिल्हातील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे हे जणू घरचे सदस्य आहेत पण त्यांच्या बद्दल सर्वांनाच सर्व माहिती आहे असे नाही. या पुस्तकातून त्यांच्याबद्दल छान जाणता आले.गोरगरिबाचा काय कुटुंबकर्ता शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ता आणि संयुक्त महाराष्ट्र सीमा चळवळीचा झुंजार सेनानी म्हणून भाई उद्धवराव पाटील यांना ओळखले जाते त्यांची ओळख केवळ एवढीच मर्यादित नसून सामान्य आणि शेतकऱ्यांसाठी त्यांनी केलेले महत कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी नक्कीच आहे.या विभूतीची आदर्श चरित्र माध्यमातून विद्यार्थी आणि थोरांना देखील ओळख झालेली आहे.डॉक्टर मामासाहेब जगदाळे यांच्या विषयी छोट्या लेखातून उत्कृष्ट आणि आवश्यक माहिती आपणाला मिळते आजपर्यंत मामासाहेब जगदाळे म्हणूनच परिचित असणारे मामा,त्यांचे नाव काय होते हे देखील अनेकांना ठाऊक नाही.मामांचे कार्य अनेक जण जाणतात परंतु त्यांचे पूर्ण नाव लोकांना माहीत नाही. अर्थात अभ्यासू लोकांसाठी माझे हे म्हणणे नाही. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी अस्पृश्यता घालवण्यासाठी केलेले प्रयत्न आणि स्वतः आंतरजातीय केलेला विवाह हा त्या काळातील एक आदर्श उदाहरण आहे त्यांच्या आयुष्यातील अनेक घटनाक्रम आपल्याला या पुस्तकांमधून अभ्यासता येतील कृषी मंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य शेतकऱ्या प्रती असणारे त्यांची निष्ठा आणि त्यांची दानत वृत्ती अत्यंत सोप्या शब्दामध्ये सौ सुदर्शना मोरे यांनी वाचकांसमोर ठेवली आहे.गोरगरिबांच्या मुलांसाठी शिक्षणाविषयी कर्मवीर भाऊराव यांनी केलेले महान कार्य त्याचबरोबर रयत शिक्षण संस्थेची वाटचाल हिंदू मुस्लिम ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मता यावर्षी त्यांचे विचार वाचकांसमोर अत्यंत खुबीने ठेवण्यात आलेले आहेत डॉक्टर लीलाताई पाटील त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्त्या शिक्षण तज्ञ असणाऱ्या अनुताई वाघ आणि विशेष म्हणजे शिक्षण म्हणजे फक्त वही पेन नाही तर शिक्षण म्हणजे मनाला माणूसकडे नेण्याचा मार्ग शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग बुद्धीला सत्याकडे नेण्याचा मार्ग ही सकारात्मक दृष्टी जोपासणाऱ्या शिक्षण तज्ञ ताराबाई मोडक यांच्या विषयी देखील या आदर्श चरित्रे पुस्तकामधून आपल्याला माहिती मिळते. आज ही छोट्या बरोबर मोठ्यांनाही संभ्रमात टाकेल आणि ते पुरुष की स्त्री असे वाटावे असे नाव म्हणजे गिजुभाई बधेगा. आधुनिक बाल शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. प्रौढ शिक्षणाचेही त्यांनी संचलन केलेले आहे.भारतात मॉन्टेसरी शिक्षण पद्धतीची सुरुवात करणाऱ्या गिजूभाई बधेगा यांचे मूळ नाव गिरीजा शंकर बधेगा असे आहे. बालक त्यांना मिशावाली आई असे संबोधन वापरत.त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आपल्याला आदर्श चरित्र हे पुस्तक वाचले पाहिजे या पुस्तकामध्ये जी चरित्र साकारली आहेत त्यासाठी ज्या संदर्भ ग्रंथांचा उपयोग सौ मोरे यांना झाला आहे त्याची सूची या पुस्तकात दिलेली असूननांदेड येथील इसाप प्रकाशन या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक वाचकांसमोर आणलेले आहे. मा.श्री. डॉ.गणपत मोरे शिक्षण उपसंचालक लातूर विभाग लातूर , तसेच समाधान शिकेतोड , बालसाहित्यकार यांच्या शुभेच्छा या पुस्तकाला प्राप्त झाल्या असून प्रसिद्ध बालसाहित्यिक , साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार प्राप्त लेखक एकनाथ आव्हाड यांची पाठराखण या पुस्तकाला झाले आहे. पुस्तकाची किमंत ६० रु आहे.सौ सुदर्शन गणपत मोरे यांनी केलेला हा प्रयत्नविद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आणि वक्तृत्व यासाठी शिवाय ज्ञानात भर म्हणून नक्कीच उपयोगी पडेल. विद्यार्थ्यांबरोबरच पालक शिक्षक सर्वांसाठी माहितीचा खजिना असेच वर्णन करता येईल.वाचन संस्कृती पुढे घेऊन जात असताना खंडरूपाने ज्यांचे चरित्रे आपण वाचू शकत नाहीत त्या लोकांसाठी आदर्श चरित्रे हे पुस्तक नक्कीच उपयोगी पडेल वाचनाचा आपण आळस करणार नाहीत आणि हे वाचल्याशिवाय आपण हातातून खाली ठेवणार नाही हा विश्वास या निमित्ताने मला वाटतो आहे सौ सुदर्शना गणपत मोरे यांना पुढील लिखाणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा....!



**हणमंत पडवळ**
शिक्षक व साहित्यिक
मो. ८६९८०६७५६६
धाराशिव.

## मच्छिमारांचे उत्पादन वाढविण्यासाठी तलावातील गाळ काढण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी - मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

**आरंभ मराठी । मुंबई**

नागपूर जिल्ह्यातील तलावातील गाळ काढणे आणि अतिक्रमण निष्कासित करण्याच्या प्रक्रियेस गती देण्यात यावी. स्थानिक मच्छिमारांचे उत्पादन वाढविण्यासाठी उच्च दर्जाचे मत्स्यबीज उपलब्ध करणे तसेच पावसाळ्यापूर्वी तलावांमधील गाळ काढण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.नागपूर जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय कामांसंदर्भात आढावा बैठक मंत्रालय येथील दालनात झाली. यावेळी आयुक्त किशोर तावडे, प्रादेशिक उपायुक्त सुनील जांभुळे आणि अधिकारी उपस्थित होते.मत्स्यव्यवसाय मंत्री राणे म्हणाले की, पर्यटनाच्या दृष्टीने राष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्यासाठी गोरेवाडा प्राणीसंग्रहालयाच्या परिसरातील जागा निश्चितीकरण करून यासंदर्भातील प्रस्ताव तातडीने सादर करावा. १६३०१ हेक्टर क्षेत्रात असलेल्या जलाशय मासेमारीकरिता लिलावात देण्यात यावे. यासंदर्भात कार्यवाही करून तातडीने अहवाल सादर करण्यात यावेत.

# लोकमंगल फाउंडेशनच्या सोहळ्यात २३ जोडप्यांच्या रेशीमगाठी

### आमदार सुभाष देशमुख, रोहन देशमुखांसह मान्यवरांची उपस्थिती

**आरंभ मराठी । धाराशिव**

सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या लोकमंगल फाउंडेशनने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करून २३ जोडप्यांच्या रेशीमगाठी बांधल्या. हा सोहळा शहरातील छायादीप मंगल कार्यालयात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या सोहळ्यासाठी लोकमंगल फाउंडेशनचे मार्गदर्शक,माजीमंत्री आमदार सुभाष देशमुख, फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी वधूवरांना आशीर्वाद देण्यासाठी मारुती तोडकर, ओमप्रकाश हिरेमठ, नाना लोमटे, रामराजे पाटील, सुधीर सस्ते,ॲड. व्यंकट गुंड, रामदास कोळगे, तानाजी पाटील, गजानन वडणे, शिवाजी सरडे, विजय शिंगाडे, दत्तात्रय राजमाने, दादा बोडके, सचिन आडगळे, नितीन गरड,बाबा दरेकर, सुरज साळुंखे, अनिल जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच भाजपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांनी सर्व वधू-वरांना स्त्री जन्माचे महत्त्व समजावून सांगितले. स्त्री जन्माचे स्वागत करा, स्त्रीभ्रूणहत्या करू नका, अशी शपथ सर्वांना देण्यात आली.या विवाह सोहळ्यात एकूण २३ जोडप्यामध्ये २ बौद्ध, १ मुस्लिम, २० हिंदू जोडप्यांचा समावेश होता. सोहळ्यात वधू-वरांना हळदी व लग्नाचे कपडे, मणीमंगळसूत्र, चप्पल, बूट, संसारोपयोगी भांडी अशा सर्व वस्तू लोकमंगल फाउंडेशनमार्फत देण्यात आल्या. यावेळी सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होत. यामध्ये अनेकजणांनी सहभाग नोंदवला.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# डॉ.तानाजी सावंतांचा शिवसेनेतून पत्ता कट?



## ■ स्वतःच्या गावातल्या मेळाव्याचे निमंत्रण नाही
## ■ जाहिरातींमधून फोटो वगळला, एकनाथ शिंदे यांचाही दौरा रद्द

आरंभ मराठी । धाराशिव

**माजी मंत्री आणि भूम-परंड्याचे आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांना पक्षाकडून पुन्हा बेदखल केल्याचे दिसत आहे. सोलापूर शिवसेनेतर्फे सोलापूर माढा येथे सोमवारी मेळावा आयोजित करण्यात आला होता.मात्र, पक्षप्रमुख एकनाथ शिंदे या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत.त्यानुषंगाने सोलापुरातील सर्व माध्यमांमध्ये या मेळाव्याच्या जाहिराती देण्यात आल्या होत्या. तसेच सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र या मेळाव्याचे होर्डिंग्ज लावण्यात आले होते. परंतु, या सर्व जाहिरातीतून माजी मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांना बेदखल करण्यात आले. विशेष म्हणजे डॉ.तानाजी सावंत यांचे बंधू प्रा. शिवाजीराव सावंत यांनीच या सोहळ्याचे आयोजन केले होते. यावरून डॉ. सावंत यांना पक्षातूनच नव्हे तर कुटुंबातूनही एकटे पाडले जात असल्याचे स्पष्ट होत आहे.**

सातत्याने वादग्रस्त विधान करून टीकेचे धनी ठरलेले डॉ.सावंत हे महायुतीच्या नवीन सरकारमध्ये मंत्री म्हणून दिसले नाहीत. दुसरीकडे अल्प मतांनी निवडून आलेले सावंत निकालापासून मतदारसंघात किंवा धाराशिव जिल्ह्यात फिरकले नाहीत.कारण कमी मतांनी निवडून आल्यामुळे त्यांची मतदारांवर नाराजी असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मतदारसंघातील प्रश्न कोण सोडविणार, विकासाच्या कामांचे काय,सध्या दुष्काळ असून, पाणी प्रश्नाने नागरिक मेटाकुटीला आले आहेत. खेकड्याने धरण फोडले, महाराष्ट्राला भिकारी करेन,हाफकिनला बोलवा आदी प्रकरणाने वादात सापडलेले डॉ.सावंत त्यांचा एक मुलगा थायलंडला निघून जाताना परत फिरवलेल्या विमान प्रकरणामुळे पुन्हा एकदा राज्यभर चर्चेत आले होते. आता पक्षातून बेदखल करण्यात आल्याने त्यांवरील नाराजीची चर्चा सुरु झाली आहे. पक्षात आणि मतदारांवर नाराज असलेल्या डॉ.सावंत यांच्यावर मात्र शिवसेना पक्ष आणि घरातील सदस्य देखील नाराज असल्याची चर्चा सुरू आहे.कारण सोमवारी माढा येथे झालेल्या मेळाव्याच्या जाहिरातीत डॉ.सावंत यांना वगळण्यात आले.तसेच या कार्यक्रमातील व्यासपीठावरच्या बॅनरवर देखील त्यांचा फोटो नव्हता. जाहिरातींमध्ये एकनाथ शिंदे, प्रा. शिवाजीराव सावंत, त्यांचे दोन चिरंजीव आणि खासदार श्रीकांत शिंदे यांचे फोटो होते. या प्रमुख फोटोंसह सोलापूर जिल्ह्यातील छोट्या मोठ्या ७० पदाधिकाऱ्यांचे फोटो देण्यात आले होते. विशेष म्हणजे सोलापूरचे पालकमंत्री भाजपचे जयकुमार गोरे यांचाही फोटो यामध्ये असताना डॉ.तानाजीराव सावंत यांनाच यातून वगळल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### एकेकाळी होता दरारा,आता छोट्या कार्यकर्त्यांनाही पडतोय विसर

शिवसेनेत सक्रिय झाल्यानंतर डॉ.तानाजी सावंत यांचा विशेषतः धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यात प्रचंड दरारा निर्माण झाला होता. किंबहुना शिवसेना पक्ष फोडण्यासाठी शे-दीडशे बैठका घेणारे डॉ. सावंत पक्षातील कुणाला कोणतं पद द्यायचं हेही ठरवत होते. त्यांनी शिवसेनेतील अनेक निष्ठावान, जुन्या पदाधिकाऱ्यांना डावलून मर्जीतील नवख्या कार्यकर्त्यांना पक्षातील पदे दिली. आता मात्र पक्षानेच त्यांना बाजूला केल्याने कुटुंबातून देखील त्यांच्या मर्जीशिवाय पक्षाचे जाहीर कार्यक्रम सुरू झाले आहेत.मागील महिन्यात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे धाराशिव दौऱ्यावर आल्या असता त्यांच्याही स्वागताच्या होर्डिंग्जवर डॉ.तानाजीराव सावंत यांना स्थान देण्यात आले नव्हते.

## विविध वृत्त...

### परंडा येथील रा गे शिंदे महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा



आरंभ मराठी । परंडा

श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परांडा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे, वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा डॉ सचिन चव्हाण, प्रा संभाजी धनवे व प्रा शंकर अंकुश यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये वाचन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले .यावेळी कार्यक्रमाचे आयोजन, प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा डॉ शहाजी चंदनशिवे यांनी केले. यावेळी प्रा शंकर अंकुश यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन वाचन किती महत्त्वाचे आहे, वाचनामुळे माणूस कसा घडतो या संदर्भात आपले व्याख्यान दिले. तर प्रा संभाजी धनवे यांनीही विद्यार्थ्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रा डॉ सचिन चव्हाण यांनी मानले.

### ॲडव्हॉन्स कॉम्प्युर कॉलेजमध्ये आज पदवीदान समारंभ

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील ॲडव्हॉन्स कॉम्प्युर कॉलेज मध्ये आज (दि.२२) पदवीदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रा.ग.शिंदे महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.महेशकुमार माने तसेच आर. पी.कॉलेज चे सहाय्यक प्राध्यापक डॉ.संदीप देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदवीदान समारंभ होणार असून, सर्व विद्यार्थ्यांनी या पदवीदान समारंभास उपस्थित राहवे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एस. एस.टकले यांनी केले आहे.

### संतोष सुपेकर व बाबा वीर यांचा भाजपच्यावतीने सत्कार



आरंभ मराठी । भूम

भाजपा कामगार मोर्चाच्या वतीने नवनियुक्त भूम तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर व शहराध्यक्ष बाबा वीर यांचा सत्कार करण्यात आला. रविवारी (दि.२०) भूम शहरातील भाजपा कार्यालयात भाजपाचे जिल्हा निवडणूक निरीक्षक गुरुनाथ मगे यांच्या मार्गदर्शनाखाली भूम तालुका अध्यक्षपदी संतोष सुपेकर यांची तर शहराध्यक्षपदी बाबासाहेब वीर यांची निवड जाहीर करण्यात आली. ही सर्व प्रक्रिया संघटन पर्व सुरू झाल्यापासून तालुका अध्यक्ष पदाच्या निवडी संदर्भातील प्रक्रिया गुप्त पद्धतीने राबविले जात होती. सर्व प्रक्रिया पूर्ण करून प्रदेश कार्यालयात पाठविण्यात आली. तिथूनच तालुका व शहराध्यक्षांची नावे जिल्हा निवडणूक निरीक्षक गुरुनाथ मगे यांच्याकडे पाठवण्यात आली. जिल्हा निवडणूक निरीक्षक गुरुनाथ मगे यांनी तालुकाध्यक्ष म्हणून संतोष सुपेकर यांचे तर शहराध्यक्ष म्हणून बाबा वीर यांची नियुक्ती जाहीर केली. भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चाच्या वतीने मराठवाडा सदस्य सचिन बारगजे यांनी नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष संतोष सुपेकर यांचा सत्कार केला. यावेळी माळेवाडीचे मा सरपंच बाप्पा बोराडे, पिंटू भारती, जोतीराम पावलेसह कार्यकर्ते उपस्थित होते.

### श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी बैठक

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विदयार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीबाबत शालेय प्रशासन व विदयार्थी वाहतुक संघटनेच्या पदाधिकाऱ्यासोबत आढावा बैठक मुख्याध्यापक कक्षात घेण्यात आली. या बैठकीसाठी प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, विदयार्थी वाहतुक चालकमालक संघटनेचे पदाधिकारी दादा गवळी व इतर त्यांचे सहकारी तसेच प्रशासकीय अधिकारी साहेबराव देशमुख, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक सुनील कोरडे, डॉ. विनोद आंबेवाडीकर, शुभम मुंडे उपस्थित होते. या बैठकीत सन २०२५ -२६ या शैक्षणिक वर्षात शासन निर्णयानुसार विदयार्थांची सुरक्षित वाहतुक कशी करावी याबाबतच्या नियमांबाबत वाहतुक संघटनेच्या पदाधिक ऱ्यांना उपमुख्याध्यापक प्रमोद कदम यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तर प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांनी गतवर्षी संघटनेने केलेल्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. प्रशासकीय अधिकारी साहेबराव देशमुख यांनी आपल्या सहकार्यातून पालक - विदयार्थ्यांना सुरक्षित वाहतुकीची हमी आम्ही देऊ शकलो याबद्दल सर्वांचे आभार मानले.



## कलाविष्कार अकादमी, मेलडी स्टार्सच्यावतीने साहित्यिक युवराज नळे यांचा सन्मान



आरंभ मराठी । धाराशिव

साहित्य, कला, क्रीडा, ऐतिहासिक पर्यटन समाजकारण, गायन, राजकारण अशा विविध क्षेत्रातील अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे युवराज नळे यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा आणि नागोराव कुंभार यांच्या हस्ते नुकतेच त्यांना सन्मानीत करण्यात आले. युवराज नळे लिखित '' मराठवाडा नव्हे, भारताचा मुक्ती संग्राम'' या शासनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकास साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय पुरस्कारही नुकताच पुणे येथे प्रदान करण्यात आला, त्याचप्रमाणे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथेही खुल्या कवी संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. या समग्र कार्याचा आढावा घेऊन कलाविष्कार अकादमी , मेलडी स्टार्सच्या वतीने युवराज नळे व सौ. वर्षा नळे या दांपत्याचा सन्मान करण्यात आला. यावेळी सत्काराला दिलेल्या उत्तरात नळे यांनी सर्वांना धन्यवाद दिले. या सन्मान कार्यक्रमात सहसमन्वयक तथा शिक्षण विस्तार अधिकारी मल्हारी माने यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कलाविष्कार मेलडी स्टार्स चे समन्वयक शरद वडगावकर, प्रभाकर चोराखळीकर, महारुद्र मोरे, रविंद्र कुलकर्णी, ॲड. दीपक पाटील मेंढेकर, धनंजय कुलकर्णी, नितीन बनसोडे, घनश्याम पाटील, महेश उंबर्गीकर, मारूती लोंढे, सुशील कुलकर्णी, सौ. वर्षा नळे, सौ. तारा मोरे, सौ. राजश्री निंबाळकर तसेच मल्हार माने यांच्या सुविद्य पत्नी आणि रुपामाता बँकेच्या संचालिका महानंदा माने, शिक्षण विस्तार अधिकारी दत्तप्रसाद जंगम, भारत देवगुडे, निसर्ग योगा वर्गाचे योगशिक्षक सूर्यकांत आनंदे, सुभाष पवार, ॲड. बय्याजी साबणे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## रंजनाताई राठोड यांची भाजपा नळदुर्ग सर्कलच्या ग्रामीण अध्यक्षपदी निवड



आरंभ मराठी । नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथील भाजपा महिला आघाडीच्या प्रमुख रंजनाताई राठोड यांची भाजपा नळदुर्ग सर्कलच्या ग्रामीण अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र तालुक्याचे आमदार आमदार राणाजगजितसिंह पाटील व सुनील चव्हाण यांच्या हस्ते भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, जिल्हा परिषद अध्यक्ष नेताजी पाटील, विक्रमसिंह देशमुख, अस्मितताई कांबळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आशिष सोनटक्के यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना भाजपाच्या नवनिर्वाचित नळदुर्ग सर्कल ग्रामीण अध्यक्षा रंजनाताई विलास राठोड बोलताना म्हणाल्या की, पक्षाने माझ्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. ती जबाबदारी चोखपणे बजावत सर्वसामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल गणेश सोनटक्के, सिध्देश्वर कोरे, अरविंद पाटील, दिपक आलुरे, साहेबराव घुगे, दत्ता राजमाने, विवेकानंद मेलगिरी, अंगद जाधव, महादेव सालगे,युवराज पाटील, संजय मोटे, अतुल भोसले, शरद भोसले, संजय माने आदीसह जळकोट, अणदूर, नंदगाव, शहापूर गटातील गणप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख, बूथ अध्यक्षांनी अभिनंदन केले आहे.

## परंडा भाजप तालुकाध्यक्षपदी अरविंद रगडे तर शहराध्यक्षपदी उमाकांत मोरे यांची निवड

आरंभ मराठी । परंडा

भारतीय जनता पार्टी परंडा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे व परांडा शहराध्यक्ष पदी उमाकांत गोरे यांची निवड करण्यात आली. यावेळी भाजपाचे नेते माजी आ.सुजितसिंह ठाकूर यांनी या दोघांचा सत्कार करुण शुभेच्छा दिल्या. परंडा तालुक्यामध्ये भाजप वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया निवडीनंतर बोलताना अरविंद रगडे यांनी दिली आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या निष्ठेला फळ मिळाले, भाजप सदस्य ते तालुकाध्यक्ष असा त्यांचा प्रवास आहे. यावेळी भाजपा धाराशिव जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, भाजपा धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव टोंपे, भाजपा माजी तालुकाध्यक्ष ॲड गणेश खरसडे, भाजपा अल्पसंख्याक प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड.जहीरभाई चौधरी, युवा मोर्चा धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष सारंग घोगरे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस किरण कवटे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी । धाराशिव

श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विद्यालयात जेईई मुख्य परीक्षेतील ॲडव्हान्स साठी पात्र झालेल्या यशवंत व गुणवंत विदयार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार संस्थाध्यक्ष सुधीर पाटील यांच्या हस्ते सोमवारी (दि.२१) करण्यात आला. गुणवंतामध्ये कुमारी विनिता दत्तात्रय कुलकर्णी हीला सरासरी ९९.५१ टक्के, कुमारी सोनिया महेश माळी हीला सरासरी ८९.१५ टक्के, कु. शुभम तानाजी कांबळे यास सरासरी ६५.६५ टक्के गुण मिळाले आहेत. या सत्कार प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष सुधीर पाटील म्हणाले की धाराशिव जिल्हयातील गुणवंत विद्यार्थ्यांना तज्ञ प्राध्यापकांकडून माफक फीसमध्ये मार्गदर्शन मिळावे हे उद्दिष्ट समोर ठेवून आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाने जेईई, एनईईटी (नीट) परीक्षेसाठी श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विद्यालय येथे धाराशिव पॅटर्न तयार करण्यासाठी अजून एक सुवर्ण संधी फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) मार्फत एक भारतातील नामवंत क्लासेस कडून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.



यासाठी पीडब्ल्यूच्या वर्गखोल्या ह्या अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये डिजिटल बोर्ड सुविधा, सर्व कॉलेज परिसर सीसीटीव्ही कक्षेत, ए.सी. वर्गखोल्या, लेक्चर रेकॉर्डिंग साठी कॅमेरे, पीडब्ल्यूचे ॲप, पीडब्ल्यू कीट, अद्यावत स्टडी मटेरियल, सुसज्य ग्रंथालय व अभ्यासिका, डेली डाऊट सॉल्विंग सत्र अशा वेगवेगळ्या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. पीडब्ल्यू क्लासेसची सुविधा इयत्ता ८ वी ते १२ वी साठी उपलब्ध आहेत. आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आत्तापासूनच पीडब्ल्यूचे वर्ग करण्याचे आवाहन संस्थाध्यक्ष सुधीर पाटील यांनी केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## केशेगाव येथील गुरुनाथ श्रीशैल्य वाघाळे यांना अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

आरंभ मराठी । धाराशिव



धाराशिव तालुक्यातील केशेगाव गावातील सुपुत्र गुरुनाथ श्रीशैल्य वाघाळे यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीत मैलाचा दगड गाठत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी ''उस्मानाबाद जिल्ह्यातील महिलांचा मानवी विकास निर्देशांक : शेतकरी व अशेती क्षेत्रातील तुलनात्मक अभ्यास'' या विषयावर सखोल आणि वास्तवाधिष्ठित संशोधन केले आहे. त्यांच्या या अभ्यासामध्ये ग्रामीण भागातील महिलांच्या शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य व सामाजिक स्तरावर होणाऱ्या विकासाचा अभ्यास करून तुलना करण्यात आली आहे. या संशोधनासाठी डॉ. बी. डी. अवघडे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांनी त्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून मोलाचे मार्गदर्शन केले. संशोधन प्रक्रियेदरम्यान अनेक तज्ञ प्राध्यापक, सहकारी व कुटुंबियांनी त्यांना मानसिक, बौद्धिक व भावनिक आधार दिला. गावकरी, नातेवाईक, शिक्षक व सहकारी वर्गातून त्यांच्यावर अभिनंदन होत आहे.

## डॉ. योगिनी संजय देशमुख यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार

### पुण्यात सन्मान, कौतुकाचा वर्षाव

आरंभ मराठी । धाराशिव

वाशी तालुक्यातील मांडवा येथील माजी सरपंच डॉ.योगिनी संजयराव देशमुख यांना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पुण्यातील पत्रकार भवनात हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

डॉ.योगिनी देशमुख यांची राज्यातील पहिली पी एच. डी. धारक (सर्वसाधारण प्रवर्ग) महिला सरपंच म्हणून नोंद झाली असून, त्यांनी गावातील विविध विकास कामे केली आहे. त्याबद्दल व त्यांच्या कार्यकाळामधील कामाचा आढावा घेऊन नालंदा ऑर्गनायझेशनने त्यांची आदर्श सरपंच, महाराष्ट्र रत्न पुरस्कारासाठी निवड केली. मांडवा गावातील अनेक वर्षांपासून रखडलेली स्मशानभूमी आणि संरक्षक भिंत बांधकाम, सिमेंट रस्ते आणि बंदिस्त गटारी, पुरातण ग्रामवेस बांधकाम लोकवर्गणीतून आणि बाकी स्वखर्चातून पूर्ण करण्यात आले आहे. शेतकरी बांधवांना शेतीसाठी लागणारा वीजपुरवठा मिळावा म्हणून आमरण उपोषण केले, त्यामुळे नजिकच्या बावी ३३ केव्ही उप केंद्रातून थेट ११ केव्ही स्वतंत्र कृषी फिडर निर्माण करण्यात आला.शाश्वत पाणी



पुरवठा (२० कोटी रुपये ) व्हावा म्हणून जलजीवन मिशन एम जी पी अंतर्गत एक लाख पस्तीस हजार लिटर क्षमतेचा जलकुंभ उभारण्यात आला असून, आठ हजार मीटर लांब गावातील वाडी-वस्तीपर्यंत नळयोजना काम सुरु आहे. स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी आर ओ वॉटर प्लांट उभारणी केली आहे.प्रधान मंत्री, रमाई आवास योजना अंतर्गत घरकुल योजना ग्रामस्थांपर्यंत पोहचवण्यात प्रयत्न करण्यात आला असून, रोजगार हमी योजने अंतर्गत विहिरी ५० हून अधिक विहिरीना मंजुरी मिळवली. शासकीय योजना राबविण्यात गाव अग्रेसर बनवले.जनावराचा दवाखाना इमारत बांधकामसाठी जिल्हा परिषदकडून निधी उपलब्ध. दलित वसतीमध्ये सौर पथदिवे बसवले.यासह अनेक कामे त्यांच्या कार्यकाळात पूर्ण करण्यात आली आहेत. पुरस्कार मिळाल्यानंतर डॉ.योगिनी संजय देशमुख यांनी नालंदा ऑर्गनायझेशनचे आभार मानले. तसेच गावातील विकास कामे करण्यासाठी मांडवा ग्रामस्थांकडून बहुमूल्य सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले म्हणूनच पुरस्काराला पात्र ठरल्याचे सांगितले.

# हिंदी विषय सक्तीचा; विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करा

## हिंदी विषय सक्तीचा करण्यावरून शिक्षकांच्या संमिश्र प्रतिक्रिया




आरंभ मराठी । धाराशिव

**नवीन शिक्षण धोरणानुसार आगामी शैक्षणिक वर्षापासून पहिलीपासून हिंदी विषय सक्तीचा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयावर प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी संमिश्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. काही शिक्षकांनी लहान वयात विद्यार्थ्यांवर विषयांचे ओझे लादल्याने गळतीचे प्रमाण वाढेल, अशी भीती व्यक्त केली आहे. तर काही शिक्षकांनी या निर्णयाचे स्वागत करून विद्यार्थ्यांनी एकापेक्षा अधिक भाषा शिकणे केव्हाही चांगलेच असे मत मांडले आहे. परंतु, दोन्हीही बाजू मांडतांना शिक्षकांनी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा सारासार विचार करून सरकारने निर्णय घ्यावा अशी भूमिका मांडली आहे. यासंदर्भातील काही प्रतिक्रिया...**




### विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून सक्ती करावी



विद्यार्थ्यांसाठी अनेक भाषा शिकणे चांगलेच आहे. इयत्ता पहिलीपासून मराठीसह सध्या इंग्रजी भाषा विद्यार्थी शिकतात. आता हिंदी भाषा देखील अनिवार्य केली तर तो विद्यार्थ्यांवर अतिरिक्त बोजा ठरेल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा अभ्यास करून भाषेची सक्ती केली तर ते योग्य ठरेल. मातृभाषेतूनच विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण झाले पाहिजे असे मानसशास्त्र सांगते. त्यामुळे असे निर्णय लागू करताना विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करून निर्णय लागू करावे.

**–बाळकृष्ण तांबारे**
**(उपाध्यक्ष, राष्ट्रीय प्राथमिक शिक्षक महासंघ)**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशीरपुरा ता. कळंब.**

### विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण येणार नाही याचा विचार व्हावा



पहिलीपासूनच हिंदी विषय सक्तीचा केल्यामुळे विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून असे निर्णय घ्यायला हवेत. पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना फक्त मातृभाषेतूनच शिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांना सर्व भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. परंतु, विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण येणार नाही याचाही विचार होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक कुवत लक्षात घेऊन निर्णयाची अंमलबजावणी करावी. ज्या विद्यार्थ्यांसाठी निर्णय घेत आहोत त्या विद्यार्थ्यांना याबद्दल काय वाटते याचा विचार करावाच लागेल.

**–सुजितकुमार खटाळ मुख्याध्यापक,**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिरसाव, ता परांडा.**

### शालेय शिक्षणात दोन्ही भाषा महत्वाच्या



मराठी ही मातृभाषा आहे तर हिंदी ही राजभाषा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी दोन्ही भाषा तितक्याच महत्वाच्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पहिली पासूनच हिंदी भाषा शिकवल्यास त्याचा त्यांना फायदाच होईल. भाषिक ज्ञान विद्यार्थ्यांना आवश्यक आहे. यामध्ये विद्यार्थी जितक्या जास्त भाषा आत्मसात करेल तितके त्याच्यासाठी चांगले असणार आहे. त्यामुळे पहिलीपासून हिंदी भाषा विद्यार्थ्यांनी शिकायला हवी.

**– प्रकाश मगर**
**शिक्षक, नरेंद्र आर्य विद्यालय अपसिंगा ता.तुळजापूर.**

### हिंदी भाषा शिकल्याने मराठीवर परिणाम होणार नाही



नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिलीपासून मराठी, इंग्रजीसह हिंदी राजभाषा शिकण्याचा आदेश महाराष्ट्र शासनाने जाहीर केला आहे. विद्यार्थ्यांना लहान वयातच विविध भाषा अवगत करण्याचा शासनाचा हा प्रस्ताव योग्य वाटतो. मला वाटते हिंदी भाषा शिकल्याने आपल्या मराठी भाषेवर कोणता परिणाम होणार नाही. कारण आपण आपल्या मातृभाषेतच दैनंदिन व्यवहार करत असतो. हिंदी भाषा अवगत झाल्यामुळे आपल्या देशाच्या कानाकोपऱ्यात या भाषेद्वारे आपण सुसंवाद साधू शकतो. कारण आपल्या देशातील निम्म्याहून अधिक जनता हिंदी भाषेचा वापर करत असते.

**– प्रकाश बसवणप्पा घोळसगाव, पदवीधर शिक्षक,**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी मार्डी, ता. तुळजापूर**

### हिंदीमुळे मराठीवर अन्याय होणार नाही



जितकं प्राधान्य मराठी भाषेला दिले जातं, तितकच प्राधान्य हिंदी भाषेला सुद्धा दिले पाहिजे. हिंदी भाषा शिकली म्हणून मराठी वाईट होणार नाही. मराठी भाषा ही आपली मातृभाषा असल्यामुळे ती आपण शिकू शकतो. हिंदी ही राष्ट्रीय भाषा असल्यामुळे त्याच्यातूनही ज्ञान मिळवायला काही हरकत नाही. यात एकमेकांचा विरोध करून काहीच उपयोग होणार नाही. शिकायला दोन्ही भाषा चांगल्याच आहेत. सरकारने जो निर्णय घेतला आहे तो निर्णय अगदी योग्यच आहे. मराठीचा जन्म संस्कृत मधून झाला आहे, संस्कृत ही सर्व भाषेची जननी आहे तिथून मराठीचा उगम झाला.

**–शिवदास कुलकर्णी, मराठी शिक्षक**
**श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय उमरगा.**

### ज्ञानार्जन करताना भाषेची अनिवार्यता नसावी



एका बाजूला संशोधक सांगतात मातृभाषेतूनच मुलांचे शिक्षण उत्तमरीत्या होऊ शकते आणि दुसऱ्या बाजूला नवीन शैक्षणिक धोरणात इंग्रजी बरोबर आता हिंदीचीही सक्ती होत आहे असे सांगितले जात आहे. भाषा हे ज्ञान मिळवण्याचे माध्यम आहे. उगाच ज्ञान मिळवण्यामध्ये भाषेची अनिवार्यता लहान बालकांमध्ये आणू नये अशा भावना पालकांतून व्यक्त होत आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त भाषा शिकाव्यात असे शिक्षक म्हणून वाटते, परंतु, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा देखील विचार व्हायला हवा. शिक्षण हे आनंदी वातावरणात व्हायला हवे.

**–संजय गरड**
**सहशिक्षक,जि.प. प्राथमिक शाळा, भोगजी, ता. कळंब.**

### पहिलीपासून हिंदी अनिवार्य नको



पहिलीचे काही विद्यार्थी हे कोऱ्या पाटीसारखे असतात. त्यांना मातृभाषेतून शिकवलेले प्रभावीपणे समजते. जर हिंदी आणि मराठी भाषा विषय एकत्र शिकवायचे झाले तर विद्यार्थ्यांना समजण्यास अडचणी येतील. काही विद्यार्थी दोन्ही भाषा सहज अवगत करतील पण सर्व वर्गाचा विचार केला तर सर्वांना हे शक्य होणार नाही. पहिली ही वाचन लेखन शिकण्याची पहिली पायरी आहे. यात दोन दोन विषयाचा ताण नकोच.

**–बोधिसत्व वाघमारे,**
**लता मंगेशकर प्रा. विद्यामंदिर, कळंब.**

### विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून सक्ती करावी



८) योग्य निर्णय वाटतो –
इयत्ता पहिली पासून हिंदी विषय शिकविण्याचा निर्णय मला योग्य वाटतो. भारतातील बहुसंख्य राज्यात स्थानिक भाषेव्यतिरिक्त हिंदी ही संपर्कभाषा म्हणून वापरली जाते. केंद्र शासनाच्या विविध आस्थापनामधे हिंदी भाषेचा वापर केला जातो. त्यामुळे पहिली पासून हिंदी भाषा शिकवली तर ती संवाद साधताना अधिक सफाईदारपणे वापरता येईल.

**–धनंजय डोळस,**
**छत्रपती संभाजी विद्यालय,**
**जवळा खुर्द ता. कळंब.**

# दिव्यांग बांधवाला कोणत्याही अडचणी आल्या तर थेट संपर्क करा

**माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचे आवाहन**

आरंभ मराठी । परंडा



महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री तथा दिव्यांग कल्याण विभागाचे माजी अध्यक्ष बच्चू कडू यांचे परंडा येथील शासकीय विश्रामगृह आले असता तालुक्यातील प्रहार संघटनेच्या ध्येयधोरणासह विविध मुद्द्यावर, दिव्यांगाच्या विविध प्रश्न संदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी तालुका प्रहार संघटना, दिव्यांग उद्योग समुहाच्या वतीने कडू यांचा सत्कार करण्यात आला. येत्या काळात दिव्यांग बांधवांना कोणत्याही अडचणी आल्या तर थेट संपर्क साधण्याचे आवाहनही बच्चू कडू यांनी दिव्यांग बांधवाना केले. यावेळी प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष आप्पासाहेब तरटे, दिव्यांग उद्योग समुहाचे अध्यक्ष तानाजी घोडके, प्रहारचे जिल्हा उपाध्यक्ष दिनेश गुडे, वैभव गायकवाड, तानाजी सोनवणे, शरद गोमासे, आकाश निरफळ, रासप तालूका अध्यक्ष मनोज पाडुळे, अनिकेत कुलकर्णी,दिव्यांग तालूका प्रमुख तानाजी सांगडे,स्वानंद कुलकर्णी आदिसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी नुकतीच बृन्मुंबई महानगरपालिकेत सहायक कार्यकारी अधिकारी पदाच्या निवडीबद्दल पत्रकार प्रकाश काशीद यांचा बच्चु कडु यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थी वाहतूक संघटनेची परांडा तालुका कार्यकारिणी जाहीर

आरंभ मराठी । धाराशिव



धाराशिव जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटनेच्या परांडा तालुक्याची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून, नूतन कार्यकारिणीचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. धाराशिव जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटना सातत्याने विविध सामाजिक कार्यामध्ये सहभाग नोंदवत आहे. परिवहन विभागामार्फत राबविण्यात येणारी रस्ता सुरक्षा रॅली असो वा महाआरोग्य शिबिर असो. दरवर्षी नवरात्रमध्ये तुळजापुरला पायी जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी फळ वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात येतो. नारीशक्ती नाईट राईड या कार्यक्रमासाठी मोफत स्कूलबस देण्यात आल्या. आता संघटनेने यापुढे जाऊन आपल्या संघटनेची व्याप्ती वाढवत धाराशिव जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटना यांची परंडा येथे शाखा स्थापन केली आहे. यावेळी परांडा विद्यार्थी वाहतूक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी बालाजी गोरे, उपाध्यक्षपदी मोहम्मद लायक डोंगरे, सचिवपदी बाबुराव गायकवाड तर कार्याध्यक्षपदी रामलिंग भिसे यांची नियुक्ती करण्यात आली. परंडा विद्यार्थी वाहतूक संघटनेची बैठक संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये पार पडली. बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य विद्यार्थी वाहतूक संघटनेचे लातूर व धाराशिव संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य विद्यार्थी वाहतूक महासंघाचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण पाडे हे अध्यक्षस्थानी होते. शालेय विद्यार्थी वाहतूक करत असताना विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक व्यवस्था, कागदपत्राची पूर्तता इत्यादी गोष्टींची बैठकीमध्ये सखोल चर्चा करण्यात आली. तसेच सुरक्षित व व्यवस्थित शालेय विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत याची ग्वाही बैठकीत देण्यात आली. यावेळी ग्लोबल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संस्थापक गोरख मोरजकर, प्राचार्य संतोष भांडवलकर, धाराशिव जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटना संस्थापक अध्यक्ष गोपाळ शिंदे, संस्थापक उपाध्यक्ष नवनाथ बारकुल, संस्थापक सचिव दादासाहेब गवळी, देशमाने,हनुमंत मदने,सुरेश शिरसाठ, बापू गायके,हनुमंत ढेकणे, संतोष विधाते, सुनील शिंदे,बंडु शितोळे, मनोज आदाटे, नवीद काझी,सतीश भाकरे, अशोक राठोड, शाहरुख मुजावर, बलभीम बनसोडे,पद्माकर कळेकर व अनिल शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच संघटनेचे तालुका जिल्हा विभाग राज्य प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश वाघमारे यांनी केले व आभार बालाजी गोरे यांनी मानले.

# आयुष्मान भारत योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न करा

**डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या सूचना**

आरंभ मराठी । धाराशिव





प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अर्थात आयुष्मान भारत योजना आणि महात्मा ज्योतिराव फ ुले जन आरोग्य योजना ह्या योजना रुग्णांना लाभ घेण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहेत. जिल्हयातील रुग्णांना विविध आजारावरील उपचार व शस्त्रक्रियांसाठी पैसे खर्च करण्याची वेळ येवू नये यासाठी आयुष्मान भारत योजनेचा लाभ शेवटच्या घटकाला मिळाला पाहिजे. असे मत आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केले. सोमवारी (दि.२१) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिरात फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत कार्ड वितरणाचा आढावा घेतांना डॉ.शेटे बोलत होते.यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.चाकुरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरीदास, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती साकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.शेटे म्हणाले की, जिल्हयातील जे रुग्णालये या योजनेअंतर्गत येत नाही परंतु त्यांच्याकडे रुग्णांना देण्यासाठी निकषानुसार सुविधा आहेत,त्यांना पण या योजनेचा लाभ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल. रुग्णांचा जीव वाचविणे हे काम महत्वाचे असून,ज्या रुग्णालयात रुग्ण भरती आहे, त्या रुग्णालयाला देखील या योजनेचा तसेच वयोवृध्द व्यक्तींना प्राधान्याने या योजनेचा तसेच लाभ देण्यात येईल.या योजनेअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी रुग्णांना चांगल्या प्रकारे आरोग्य सेवेचा लाभ दयावा असे डॉ.शेटे यावेळी म्हणाले. जिल्हयातील सर्व खाजगी रुग्णालयांना आरोग्य विभागाने आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची माहिती दयावी असे सांगून डॉ.शेटे म्हणाले की,त्यामुळे ते रुग्णालये देखील या योजनेत सहभागी होतील.ही योजना राबवितांना कोणत्याही उणीवा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यामुळे गरीबांना मोठया प्रमाणात या योजनेचा लाभ देता येईल.या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी रेशनकार्ड अपडेट करुन घ्यावे. आरोग्य मित्राने रुग्णालयात येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना या योजनेची माहिती द्यावी.रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना तसेच नागरिकांना या योजनेची अधिक माहिती जाणून घ्यायची असल्यास तसेच कोणते रुग्णालय या योजनेत नोंदणीकृत आहेत याबाबतची माहिती जाणून घ्यायची असल्यास १८००२३३२२०० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून जाणून घ्यावी. असे आवाहनही डॉ.शेटे यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, जिल्हयातील जास्तात जास्त रुग्णांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी जिल्हयातील सर्व खाजगी रुग्णालयांना या योजनेची माहिती देण्यात येईल. त्यामुळे जिल्हयातील अनेक रुग्णालये या योजनेत सहभागी होतील,असे ते म्हणाले.

आयुष्मान भारत
प्रधान मंत्री जन स्वास्थ्य योजना

# मारुती बनसोडे भीमपुत्र आयडॉल २०२५ ने सन्मानित



आरंभ मराठी । नळदुर्ग

गेली ३८ वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करणारे परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांना बारामती येथे सावित्रीबाई फ ुले विद्यापीठ पुणे चे माजी कुलगुरु डॉ नरेंद्र जाधव व खासदार सुनेत्रा ताई पवार यांच्या हस्ते भीमपुत्र आयडॉल २०२५ हा पुरस्कार देण्यात आला. भारतातून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १२ जणांचा बारामती येथील संविधान विचार मंच या संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांची माहिती स्क्रीन वर दाखविण्यात आली. खा. सुनेत्राताई पवार यांनी संविधानाचे महत्व समजावून सांगितले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खासदार व पुणे विद्यापीठांचे माजी कुलगुरु डॉ नरेंद्र जाधव यांनी संविधान सभेचा कार्यकाळ व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मिती मधील योगदान यावर आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संविधान विचार मंच बारामतीचे अध्यक्ष राजेश कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन घनशाम केळकर यांनी मानले.